# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

(२) **कृषी मंत्री** : "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी,२०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] –**

(१) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, सर्वश्री. सदाशिव खोत, ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री. संजय केणेकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात १८ वर्षांखालील सुमारे ४ कोटीहून अधिक बालके असून त्यापैकी जवळपास ३ कोटी बालके १५ वर्षाखालील असणे, राज्यात शालेय व अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलवर ऑनलाईन गेम्स खेळण्याचे प्रमाण वाढत असून याविषयी पालकांनी चिंता व्यक्त केली असणे, परिणामी मुलांचे मानसिक, शैक्षणिक आणि सामाजिक आरोग्य धोक्यात आले असणे, शिक्षणासाठी आवश्यक असलेला मोबाईल आज अनेक मुलांसाठी व्यसनाचे साधन ठरत असल्याने मोबाईलमधील गेम्सवर बंदी घालण्याची मागणी

रोटा/एचबी-१०९३ (१,८००-०२-२०२६)-१

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२६ वा त्यादरम्यान केली असणे, ऑनलाइन वर्ग, अभ्यास, माहिती संकलन आदी कारणांसाठी ही मुले मोबाईलचा सर्रास वापर करीत असणे, लहान वयातच स्क्रीनवरील वाढता वेळ मुलांच्या विकासासाठी घातक ठरत असून मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव, चिडचिडेपणा, झोपेचे विकार, अभ्यासातील घसरण, मानसिक तणाव वाढत असणे, मोबाईल गेम्सवरील बंदी, मुलांचे समुपदेशन व त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्याची आवश्यकता, मैदानी खेळ, वाचन व कुटुंबाशी वेळही कमी होत असणे, हे चित्र देशाच्या भविष्यासाठी गंभीर असल्याची भावना राज्य शिक्षक परिषदेने व्यक्त करणे, त्यामुळे मुलांच्या मानसिक, शैक्षणिक आणि सामाजिक आरोग्यावर घातक परिणाम करणारे मोबाइलवरील ऑनलाइन गेम्स तत्काळ बंद करावेत किंवा त्यावर कठोर निर्बंध आणण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

(२) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"नवी मुंबईतील नेरुळ सेक्टर २५ भूखंड क्र. ३६,३७,३८ या ठिकाणी बांधकाम करण्यास बांधकाम व्यावसायिकास सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ६ जून, २०२४ रोजी पत्रव्यवहार करुन सदर बांधकाम परवानगीबाबत सिडकोने हस्तक्षेप करु नये, यासंदर्भात नवी मुंबई महानगरपालिका परवानगी देईल असे स्पष्ट आदेश दिलेले असणे, असे असूनही सिडकोचे मुख्य नियोजनकार यांनी दिनांक १८ जुलै, २०२४ रोजी, दिनांक १ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंतची एक वर्षाची बांधकाम परवानगी दिल्याचे उघडकीस येणे, सचिव ,नगरविकास विभाग, मंत्रालय यांचे आदेश धुडकावून मुख्य नियोजनकार यांनी दिलेली बांधकाम परवानगीसंदर्भात तक्रार दाखल झाली असता एक दिवस आधी परवानगीची मुदत संपण्यापूर्वी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी परवानगी रद्द करण्यात आल्याचे दाखवून प्रत्यक्षात काम सुरु ठेवणे, या बांधकाम प्रकल्पातील सदनिका विक्री सुरु असणे, सुरु असलेल्या सदनिका विक्रीमुळे मोठ्या प्रमाणात लोकांची होत असलेली फसवणूक, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाच्या नियमाची व आदेशाची होत असलेली पायमल्ली, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन यास जबाबदार

असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सर्व समाज कार्य महाविद्यालय समाज कल्याण विभागाकडून सन २०२४ मध्ये उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येणे, समाज कल्याण विभागाकडे हे सर्व महाविद्यालय असतांना शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध वेळोवेळी मंजूर करण्यात येत असणे, परंतु दोन वर्षापासून समाज कल्याण विभागाकडून उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरण होऊनसुध्दा अद्याप आकृतीबंध मंजूर करण्यात आला नसणे, राज्यातील समाज कार्य महाविद्यालय मध्ये २७१ पेक्षा अधिक शिक्षकांची पदे रिक्त असणे, तसेच शेकडो पेक्षा अधिक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील रिक्त पदे भरण्याकरिता शासन निर्णय निर्गमित केला असणे, परंतु या शासन निर्णयामध्ये समाज कार्य महाविद्यालयाचा उल्लेख नसल्यामुळे राज्यातील समाज कार्य महाविद्यालयामध्ये नजिकच्या काळात मोठ्या प्रमाणात शिक्षक पदे रिक्त असल्यामुळे समाज कार्य महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेचा व अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला असणे, तेव्हा राज्यातील सर्व अनुदानित समाज कार्य महाविद्यालय उच्च शिक्षणाच्या अधिपत्याखाली येत असल्याने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ च्या शासन निर्णयामध्ये समाज कार्य महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली २७१ शिक्षक पदे भरण्याकरिता शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **डॉ. परिणय फुके,** सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोसेखुर्द प्रकल्प शंभर टक्के भरल्यामुळे निर्माण झालेल्या बॅक वॉटरचा थेट फटका नागपूर आणि भंडारा जिल्ह्यातील ४२ गावांना बसत असून या गावातील शेती आणि घरे पाण्याखाली गेल्याने गावकऱ्यांचे अतोनात नुकसान होत असणे, या बाधित ४२ गावांना 'प्रकल्पबाधित' ठरवून त्यांचे

कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याऐवजी जलसंपदा विभागाकडून त्यांना केवळ 'पूरबाधित' ठरवण्याचा प्रयत्न केला जात असल्याने बाधितांमध्ये तीव्र संताप पसरणे, सन २०२२ मधील प्रकल्पाच्या चाचणी दरम्यान संभाव्य धोक्याची जाणीव होऊनही प्रशासकीय पातळीवर पुनर्वसनासाठी कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नसणे, इंदिरा सागर प्रकल्पाच्या विस्तारामुळे १८९ गावे आधीच प्रकल्पबाधित ठरविण्यात आलेली असताना, केवळ तांत्रिक त्रुटींमुळे उर्वरित ४२ गावे आजही पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असणे आणि पाणी थेट घरांच्या भिंतीपर्यंत पोहोचल्याने गावकऱ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला असणे, तांत्रिक निकषांचा आधार घेऊन गावकऱ्यांना हक्काच्या लाभापासून वंचित ठेवले जात असून ड्रोन सर्वेक्षणासारखी केवळ आश्वासने देऊन जमिनी स्तरावर कोणताही प्रत्यक्ष दिलासा दिला जात नसणे, प्रकल्पाच्या मूळ नियोजनात बॅक वॉटर क्षेत्राचा विचार न करणे ही प्रशासकीय यंत्रणेची गंभीर चूक असणे, तरी शासनाने तातडीने या ४२ गावांना 'प्रकल्पबाधित' घोषित करावे, त्यांचे पुनर्वसन धोरण स्पष्ट करावे आणि बाधितांना योग्य आर्थिक मोबदला देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५)** **सर्वश्री सुधाकर अडबाले,** अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, पंकज भुजबळ, किरण सरनाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ नुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशतः / पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व पदभरती करण्याबाबत मान्यता देण्यात आली असणे, सदर शासन निर्णयानुसार राज्यात शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरती करण्यात आली असणे, त्यास वैयक्तिक मान्यता देण्यात आलेल्या असणे, मात्र, सदर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडी प्रलंबित असणे, तसेच शालेय शिक्षण विभागांतर्गत यू डायस, सरल व शालार्थ या ऑनलाईन प्रणालींमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असणे, त्यामुळे राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये वाढता रोष बघता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या व शालार्थ आयडी देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री. संजय केणेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात अल्पवयीन मुलांमध्ये मोठया प्रमाणात इंटरनेट आणि सोशल मिडियाचा वापर असणे, इंटरनेट व सोशल मिडियाचा योग्य वापर होत नसल्याने अल्पवयीन मुलांना हानीकारक होणे, त्याचबरोबर या माध्यमाच्या वापरामुळे मुलांमध्ये अधीरता, राग आणि आळस यासारखे गुण वाढलेले असणे, इंटरनेट आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कोणतेही "गेटकीपिंग नाही, अल्पवयीन मुलांना ड्रग्ज, तंबाखू किंवा पोर्नोग्राफिक सामुग्री सहजपणे मिळणे, यामुळे आत्महत्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे समोर येणे, याकरिता १६ वर्षाखालील मुलांना इंटरनेट आणि सोशल मिडियापासून संरक्षण मिळावे याकरिता राज्य शासनाकडून काही कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता, तसेच मुलांनी इंटरनेटचा वापर नियंत्रित करणारा कायदा करणे आवश्यक असणे, ऑस्ट्रेलियामध्ये मुलांना सोशल मिडियाचा वापर करण्यास मनाई करणारा कायदा आणला गेला त्याचधर्तीवर केंद्र सरकारने मुलांचे संरक्षण व्हावे याकरिता कायदा आणण्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्राकडे शिफारस करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून युध्दपातळीवर करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सात : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**आठ : (मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) --**

**सर्वश्री प्रविण दरेकर, हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, दादाराव केचे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, अमोल मिटकरी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री संजय केणेकर, संदीप जोशी, वसंत खंडेलवाल, प्रसाद लाड, अमरिशभाई पटेल, ॲड. निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, वि.प.स.** यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक

स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतक-याला जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतक-यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांतून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांमुळे शेडयुल १ मधून शेडयुल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, सन २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

**नऊ : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

(१) **सर्वश्री सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**"**राज्याच्या कृषी व सिंचन व्यवस्थेचा आरसा असलेला **'**आर्थिक पाहणी अहवाल**'** गेल्या १४ वर्षांपासून अपूर्ण माहितीच्या आधारे प्रसिद्ध होत आहे**,** ही बाब राज्याच्या प्रगतीसाठी अत्यंत भूषणावह नाही**.** सिंचनाखालील क्षेत्राची अद्ययावत आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे राज्याचा नेमका सिंचन अनुशेष किती आहे आणि तो दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात**,** याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे कठीण झाले असणे**,** या प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालय आणि कृषी आयुक्तालयातील संबंधित शासकीय अधिकारी व यंत्रणेने माहिती संकलनाबाबत कमालीचा निष्काळजीपणा व दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येत असणे**,** कारण अनेक जिल्ह्यांची माहितीच प्राप्त झालेली नसणे**,** अद्ययावत माहितीअभावी सिंचन प्रकल्पांसाठी नियोजित

केलेल्या शासकीय निधीचा विनियोग करताना तांत्रिक पेच निर्माण होत असून**,** यामुळे शेतकरी व समाजावर विपरीत परिणाम होत असणे**,** तरी शासनाने सदर माहिती तातडीने संकलित करून अहवालात समाविष्ट करावी**,** याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना**."**

(२) **सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"बीड जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यांसाठी आरोग्यदायी ठरणाऱ्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात विविध योजना राबविण्यात आलेल्या नसणे, शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टीची सोय उपलब्ध करुन दिलेली असणे, मात्र तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि कुशल तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याने सदर यंत्रणेचा वापर होत नसणे, तसेच येथे कार्डिओलॉजिस्टची (हृदयविकार तज्ज्ञ) नियुक्तीही कायमस्वरुपी झालेली नसून सद्य:स्थितीत केवळ एका वैद्यकीय अधिकाऱ्याची वरिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी पदावर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली असून त्यांनाही केवळ चार महिन्यांच्या आदेशावर काम करावे लागत असणे, परिणामी ग्रामीण भागातील गरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत असून अंबाजोगाई आणि परिसरातील सर्वसामान्य व गरीब रुग्णांसाठी “स्वाराती रुग्णालय” हा मोठा आधार असणे, मात्र हृदयविकाराचा झटका आल्यास किंवा तातडीच्या हृदयशस्त्रक्रियेची गरज भासल्यास येथे उपचार मिळत नसल्याने रुग्णांना लातूर किंवा सोलापूर येथील खाजगी रुग्णालयांत जावे लागते असल्याने रुग्णांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असणे यावर शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६.

**डॉ.विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.